**वादी यांचे साक्षीदार क्रं. ०२**

**नाव– चंद्रकांत काशीनाथ अप्प्पा समगे**

**वय–५६ वर्षे धंदा– शेती,**

**रा. आनंद नगर,उदगीर**

**वादी यांचे साक्षीदार क्रं. ०२ यांचा शपथेवर सरतपास वादी तर्फे श्री.बी.पी.आंबेकर वकील यांच्या मार्फत ः–**

मी चंद्रकांत, शिवराज, बस्वराज व राजकुमार या चौघांना ओळखतो ते सख्खे भाउ आहेत. राजकुमार यांना माझ्या भावाची मुलगी दिलेली आहे. या कारणामुळे ते चौघेही आमचे पाहुणे आहेत. त्या दोघांची उदगीर येथे सर्वे क्रं. २८०/६ अशी जमीन असल्याचे माझे माहितीतील नाही. मी उप्परबावडे यांच्या वाटणीची मिटविण्यासाठी बोलणी करायला गेलो होतो. माझे सोबत नगरसेवक मल्लीकार्जून कानबंदे व उमाकांत बिरादार ,अशोक पाटील असे आम्ही पाच–सहा लोक गेलो होतो. मी बोलणी करण्यासाठी गेलो होतो मी दोन–तीन तास तिथे होतो. त्यांना भांडणे मिटवा म्हणून सांगून कंटाळलो. मी तिथून निघायला लागल्यावर कानबंदे यांनी एका कागदावर माझी सही घेतली. मला निशाण ४ सोबत १४.०९.२०१४ चे टिपण दाखविले. त्यावर माझी सही दिसते. त्यानंतर मी काही दिवसांनी तेथे गेलो असता मला वाटणी झाले बाबत काही समजले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की वादाच्या जागेत चौघे भाउ घर करुन राहतात. ते ज्यानी–त्यांनी घरातील सांडपाणी काढले कि काय हे मला माहित नाही.

**साक्षीदार तर्फे उलटतपास प्र.वादी तर्फे श्री.अॅड.पी.एम.कोणे यांच्या मार्फत सुरुः–**

शिवराज यांच्या घराचे बांधकाम २००३ साली व त्यानंतर चंद्रकांत व इतराचे बांधकाम झाले. शिवराजच्या जागेच्या पूर्व बाजूला चंद्रकांतचा खुला प्लॉट आहे. शिवराजच्या घराच्या उत्तरेला पाणंद रस्ता आहे. शिवराजच्या

.. .. **नियमीत दिवाणी दावा क्र.६९८/२०१९**

**नि.क्र. ५७**

**चंद्रकांत उप्पर बापडे वि.शिवराज उप्परबावडे**

पूर्व बाजूला असलेला चंद्रकांतच्या प्लॉटच्या उत्तर बाजूला पाणंद रस्ता आहे. पाणंद रस्त्याला लागून चंद्रकांतचा खुल्ला प्लॉट आहे. प्लॉटचा दक्षीणेला चंद्रकांतचे बांधलेले घर आहे. चंद्रकांत व शिवराज यांचे घरे पश्चीम मुखी आहेत. पश्चीममुखी रस्त्याला कोणतेही नाली करण्यात आली नाही. चंद्रकांतच्या जागेतील सांडपाणी त्या जागेतील उत्तर जागेच्या पाण रस्त्यातून जाते व वाहते. ज्या दिवशी कानबंदे यांनी को–या कागदावर सही घेतली, त्या दिवशी चारी भावात असलेले भांडण मिटले नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, उप्पर बापडे यांचे तीन ते चार ठिकाणी मिळकती आहेत. त्या दिवशी जो वाद चालला होता तो उप्परबावडे यांच्या तीन चार मिळकतीचा वाद होता. त्या दिवशी नालीचा किंवा प्लॉटच्या उत्तरे कडील व पाणंद रस्त्याचा वाद उदभवला नव्हता.

पुनःतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.10 15:06:57 +0530

( श्री व्ही. आर. घराळ )

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

उदगीर.

उदगीर.

दिनांकः– १०.०७.२०२६